Registered No. B. 1.

# THE Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 4TH MARCH 1897.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुकाम जंजिरे मुंबई, तारीख ३ री फेब्रुवारी, सन १८९७.

नंबर ९११.—हिंदुस्थान सरकारचा खालीं दिलेला जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला असेः—

" फिनान्स ॲण्ड कामर्स डिपार्टमेंट.

सेपरेट रेव्हिन्यू.

स्टांप.

मुकाम कलकत्ता, तारीख २८ वी जानेवारी, सन १८९७.

नंबर ४९८. एस्. आर.—हिंदुस्थानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला) याच्या ८ व्या कलमावरून दिलेले अधिकार चालवून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं, तगाईच्या फेडीसाठीं जमीन धारण करणारांनीं लिहून दिलेल्या ज्या खतांवर, सदर्हू तगाई संकटनिवारणार्थ दिल्या आहेत असा कलेक्टराच्या सहीनिशीं शेरा लिहिलेला असेल त्या खतांवर, सदर्हू आक्टाअन्वयें घ्यावयाची ड्यूटी माफ केली आहे.

ही माफी, सन १८९७ च्या डिसेंबर महिन्याच्या ३१ व्या तारखेनंतर लिहून दिलेल्या खतांस लागू नाहीं.

(सही) जे. एफ्. फिन्ले,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

आलीजाह धि रैट ऑनरेबल धि गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल ह्यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. मॉन्टीथ,

आक्टिंग सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

# रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख २७ माहे जानेवारी सन १८९७.

नंबर ६९४.—हिंदुस्थान सरकारचा खालील जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला आसे :—

"फिनान्स अॅण्ड कामर्स डिपार्टमेंट.

सेपरेट रेव्हिन्यू.

## स्टांप.

मुक्काम कलकत्ता, तारीख २० माहे जानेवारी सन १८९७.

नंबर ३४२–एस्. आर.—हिंदुस्थानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १) याच्या ८ व्या कलमांत दिलेले अधिकार चालवून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं, जमीन सुधारणा कर्ज आक्ट (सन १८८३ चा १९) याच्या ४ थ्या कलमांत किंवा शेतकरी लोकांचा कर्ज आक्ट (सन १८८४ चा १२), कलम ४ (१) यांत निर्दिष्ट केल्यापैकीं कोणत्याही कारणाकरितां जमीनदारांनीं आपल्या कुळांस किंवा आपल्या कुळांच्या पोटीं धारण करणाऱ्या मनुष्यांस दिलेलें कर्ज परत मिळण्याचा बंदोबस्त करण्यासाठीं, या तारखेनंतर व सन १८९८ च्या जानेवारीच्या १ ल्या तारखेपूर्वीं करून दिलेल्या दस्तऐवजांवर या आक्टाअन्वयें पडणारी सर्व ड्यूटी माफ केली आहे.

मात्र या जाहिरनाम्यावरून दिलेली माफी—

(१) विपत्ति प्राप्त झालेले जे प्रदेश स्थानिक सरकार स्थानिक सरकारी गझेटांत जाहिरनामा देऊन या बाबतींत प्रसिद्ध करील त्या प्रदेशांस मात्र लागू होईल, आणि तसेंच

(२) ज्या दस्तऐवजांमध्यें—

(अ) ज्या कारणाकरितां कर्ज देण्यांत येईल तें कारण दस्तऐवजाच्या मुख्य भागांत लिहिलेलें असेल, व

(ब) त्या कर्जावर बसविलेला व्याजाचा दर दरसाल दरशेंकडा चार टक्यांहून जास्त नसेल, त्या दस्तऐवजांस मात्र लागू होईल.

(सही) जे. एफ्. फिन्ले,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

आलीजाह नेक नामदार गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

जे. मॉन्टीथ,

आक्टिंग चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation.)

M. A BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.